www.rajdand.com
सातारा शनिवार
१७. २. २०२४
पृष्ठ ४ ! मुल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९
२५ वर्षे विश्वासार्हतेची

**महत्त्वाचे**

### म्हाडाच्या अध्यक्षपदी शिवाजीराव आढळराव पाटील

**मंचर :** पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण अर्थातम्हाडाच्याअध्यक्षपदी माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांची नियुक्ती राज्य शासनाने केली आहे. त्यांना राज्यमंत्रीपदाचा दर्जा असणार आहे.- ऊ्तएठ्ढखडएचएछ्ढतीन वेळा खासदार राहिलेले शिवाजीराव आढळराव पाटील हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कट्टर समर्थक आहेत.

मागील वर्षभरात राज्यसरकारच्यामाध्यमातून त्यांनी शिरूर लोकसभा मतदारसंघासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी आणला आहे. दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेवरून त्यांची आज म्हाडाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्य शासनाचे सहसचिव अजित कवडे यांनी जीआर काढला आहे. राज्य शासनाचे महत्त्वाचे महामंडळ आढळराव पाटील यांना मिळाले असून त्यांना राज्यमंत्री पदाचा दर्जा असणार आहे.आगामी लोकसभा निवडणुकीसाठी शिवाजीराव आढळराव पाटील प्रबळ दावेदार असूनम्हाडाचेअध्यक्ष पद मिळाल्याने अधिक वेगाने कामे होतील अशी प्रतिक्रिया कार्यकर्त्यांनी दिली आहे.

# तिसऱ्या दिवशीही मराठा आरक्षणाचे आंदोलन तीव्र

## उमरग्यात बस पेटवली, कळंबमध्ये दगडफेक, टायर पेटवून चक्काजाम

**धाराशिव :** मराठा आरक्षणासंदर्भात राज्य सरकारने काढलेल्या अध्यादेशाची तत्काळ अंमलबजावणी करण्यासाठी मराठायोध्दा मनोज जरांगे पाटील यांचे सातव्या दिवशीही उपोषण सुरू होते. त्यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ पुकारण्यात आलेल्या महाराष्ट्र बंदच्या तिसर्या दिवशीही जिल्हाभरात कडकडीत बंद होता.

धाराशिव - मराठा आरक्षणासंदर्भात राज्य सरकारने काढलेल्या अध्यादेशाची तत्काळ अंमलबजावणी करण्यासाठी मराठायोध्दा मनोज जरांगे पाटील यांचे सातव्या दिवशीही उपोषण सुरू होते. त्यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ पुकारण्यात आलेल्या महाराष्ट्र बंदच्या तिसर्या दिवशीही जिल्हाभरात कडकडीत बंद होता. दरम्यान बंद असतानाही वाहतूक होत असल्याने संतप्त मराठा युवकांनी उमरगा तालुक्यात बस पेटविणे, कळंब तालुक्यात भर रस्त्यात टायर पेटवून आपला संताप व्यक्त केला. तर धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दुसर्या दिवशीही १५ बैलगाड्या, ट्रॅक्टरसह मराठा समाजबांधव ठिय्या मांडून होते.

गुरूवारी सांजा येथील १८ बैलगाड्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात ठाण मांडून असलेल्या बैलगाड्या दुसर्या दिवशीही तिथेच होत्या. पाणी-वैरणीच्या सोयीसह आलेल्या मराठा समाजातील शेतकर्यांनी प्रमुख मार्गावर बैलगाड्या सोडून, मुख्य रस्त्यावर आंदोलन केले. 'मराठा आरक्षण आमच्या हक्काचे, नाही कोणाच्या बापाचे', 'एक मराठा, लाख मराठा', अशा घोषणांनी छत्रपती शिवाजी महाराज चौक दणाणून गेला होता.

कळंबमध्ये बसवर दगडफेक

कळंब : आरक्षणासाठी आंदोलनकर्ते मनोज जरांगे-पाटील यांची प्रकृती खालावल्याने कळंब तालुक्यात आरक्षणाचे आंदोलन पेटले होते. लातूर-



कळंब मार्गावर लातूर आगाराच्या बसवर दगडफेक करण्यात आली. शुक्रवारी विविध मार्गावरील बसफेर्या बंद करण्यात आल्याने आगारात शुकशुकाट निर्माण झाला होता.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज सकल मराठा समाजाच्या वतीने चक्का जाम आंदोलन करण्यात आले. त्यामुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात झाल्याचे पहावयास मिळाले. तालुक्यातील देवळाली येथील शेकडो समाजबांधवांनी कळंब-ढोकी मार्गावर रास्ता रोको करून शासनाचा निषेध केला. तालुक्यातील हावरगाव येथे रस्तत्यावर झाडी तोडून टाकण्यात आली. यामुळे चार तास या हासेगाव - इटकूर पारा मार्गावरची वाहतूक विस्कळित झाली होती. लातूर-कळंब-भाटसांगवी मार्गावर खोंदला, सत्रा परिसरातील मराठा समाज एकत्र येत खोंदला पाटीवर टायर जाळून रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.

## मार्चच्या पहिल्या आठवड्यात आचारसंहिता; अजित पवारांचे कार्यकर्त्यांना घराबाहेर पडण्याचे आदेश



**मुंबई** मी मुख्यमंत्री पदासाठी हपापलेला नाहीय. मी पक्षही चोरलेला नाहीय असे सांगत उपमुख्यमंत्रीअजित पवारांनी बारामतीतील कार्यकर्त्यांना प्रचाराच्या कामाला लागण्याचे आदेश दिले आहेत. याचबरोबर मार्चच्या पहिल्या आठवड्यात लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागेल, असे सुतोवाचही केले आहे

देशात आता लोकसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. अशावेळीअजित पवारबारामतीकरांनाभावनिक साद घालू लागले आहेत. शरद पवार, सुप्रिया सुळेंविरोधात कार्यकर्त्यांना ते सावध करत आहेत. भावनिक होऊन प्रश्न सुटत नाही, भावनिक होऊन कामे होत नाहीत, असे अजित पवार यांनी आज बारामतीतील राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना सांगितले.याचबरोबर संस्थांचे जे पदाधिकारी आहेत त्यांनीही घराबाहेर पडावे. कार्यकर्त्यांनी आपल्या पाहुण्या रावळ्यांना भेटावे, त्यांना समजून सांगावे, असे आदेश अजित पवार यांनी दिले आहेत. गावात दोन गट आहेत, ज्याचा निवडून येईल त्याला मदत करा. आम्ही कोणाचा पक्ष चोरला नाही हे सांगा. संसदेत भाषण करून प्रश्न सुटत नाहीत हे सांगा.

# पावनखिंडीसाठी राज्य सरकारकडून १५ कोटींचा निधी

## एकनाथ शिंदे यांची घोषणा

**कोल्हापूर :** नरवीर बाजीप्रभू देशपांडे ज्या पावनखिंडीत धारातीर्थी पडले, त्या विशाळगडाजवळील पावनखिंडीसाठी १५कोटी रुपयांचा निधी राज्य सरकार मंजूर करत आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी केली. राज्यातील सर्वगड कोटांचे राज्य सरकार संवर्धन करते आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचाआदर्श मानून राज्याचे सरकार आपण चालवतोय, असेही त्यांनी सांगितले. शिवाजी पेठेतील श्री शिवाजी तरुण मंडळातर्फे शिवजयंती निमित्त उभारलेल्या शिवछत्रपतींच्या अश्वारूढ मूर्तीचे मुख्यमंत्र्यांनी दर्शन घेत अभिवादन केले. यावेळी शिवकालीन ऐतिहासिक किल्ल्याच्या प्रतिकृतीचे त्यांनी कौतुक केले आणि सर्वांना शिव जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.



औरंगजेबाने शिवरायांना जेथे नजरकैदेत ठेवले त्या आग्रा शहरात शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात आला आहे, असेतेम्हणाले.यावेळी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, राज्य नियोजन कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष राजेश क्षीरसागर, खासदारसंजय मंडलिक, माजी आमदार चंद्रदीप नरके उपस्थित होते. अध्यक्ष सुजित चव्हाण यांनी मुख्यमंत्र्यांचे स्वागत केले. उत्सव समितीचे अध्यक्ष राहुल जरग यांनी मुख्यमंत्र्यांना मानाचा फेटा बांधला. शिवशाहीर राजू राउत यांचा पोवाडा - शिवशाहीर राजू राउत यांनी गायलेल्या रायगड आपल्या गावी या पोवाड्याला रसिक श्रोत्यांचा प्रतिसाद लाभला. देखावा पाहण्यास गर्दी प्रतापगडावरील अफजलखानवध, राजमहालात शाहिस्तेखानावर केलेला वार, हे शिवप्रतापाचे प्रसंग आणि राज्याभिषेकावेळी जिजाऊ माँ साहेबांचा चरणस्पर्श या प्रसंगासह काल्पनिक किल्ल्याची भव्य प्रतिकृती पाहण्यासाठी शुक्रवारी सायंकाळपर्यंत अनेकांनी गर्दी केली होती.

# आर अश्विनने अचानक घेतली माघार, भारताला १० खेळाडूंसह खेळावे लागणार



**मुंबई** २ - इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत भारतीय संघाला धक्क्यांमागून धक्के मिळताना पाहायला मिळत आहे. वैयक्तिक कारणामुळे सुरुवातील पहिल्या दोन सामन्यांतून माघार घेणाऱ्या विराट कोहलीने संपूर्ण मालिकेकडेच पाठ फिरवल्याची दिसली. त्यात दुखापतीचे ग्रहण आहेच. लोकेश राहुलला दुसऱ्या व तिसऱ्या कसोटीला मुकावे लागले. त्यामुळे युवा खेळाडूंना पदार्पणाची संधी मिळाली. त्यात आता स्टार फिरकीपटू आर अश्विन ( ठ -ह्रिुळप ) याने अचानक तिसऱ्या कसोटीतून माघार घेतली आहे. त्यामुळे भारताला उर्वरित कसोटीत १० खेळाडू व १ बदली खेळाडूसह खेळावे लागणार आहे. आर अश्विनने आज एक विकेट घेत कसोटी इतिहासात ५०० विकेट्सचा टप्पा गाठला असताना त्याच्या अचानक माघार घेण्याने भारतीय चाहत्यांना धक्का बसला आहे.

फलंदाजीला पोषक खेळपट्टीवर इंग्लंडकडूनही सडेतोड उत्तर मिळाले. भारताच्या पहिल्या डावाच्या ४४५ धावांच्या प्रत्युत्तरात सलामीवीर बेन डकेटने वेगवान शतक झळकावले. इंग्लंडच्या फलंदाजांनी बॅझबॉल खेळ कायम राखताना साडेसहाच्या सरासरीने धावा कुटल्या आणि दिवसअखेर २ बाद २०७ धावांपर्यंत मजल मारली. झॅक क्रॉली ( १५) याची विकेट घेऊन अश्विनने कसोटीत ५०० वी विकेट पूर्ण केली. अनिल कुंबळे यांच्यानंतर असा पराक्रम करणारा तो दुसरा भारतीय गोलंदाज ठरला. पण, अश्विनने २५७१४ चेंडूंत हा टप्पा पार केला. डकेट व ऑली पोप ( ३९) यांनी भारतीय संघाची झोप उडवताना ९३ धावांची भागीदारी केली. इंग्लंडने ३५ षटकांत २ बाद २०७ धावांवर दुसऱ्या दिवसाचा खेळ संपवला. डकेत ११८ चेंडूंत २१ चौकार व २ षटकारांसह १३३ धावांवर नाबाद आहे.

इउउख ने दिलेल्या माहितीनुसार अश्विनने कौटुंबिक कारणामुळे तिसऱ्या कसोटीतून माघार घेतली आहे. त्याच्या कुटुंबात वैद्यकिय इमर्जन्सी आल्याने त्याला ही माघार घ्यावी लागली आहे. या कठीण काळात बीसीसीआय आणि संपूर्ण टीम त्याच्यासोबत आहे, असे बीसीसीआयने म्हटले आहे.खेळाडू आणि त्यांच्या प्रियजनांचे आरोग्य आणि कल्याण हे अत्यंत महत्त्वाचे आहे. बोर्डाने अश्विन आणि त्याच्या कुटुंबाच्या गोपनीयतेचा आदर करण्याची विनंती केली आहे. ही त्याच्यासाठी आव्हानात्मक वेळ आहे. बोर्ड आणि संघ अश्विनला आवश्यक ती मदत करत राहील,'' असेही बीसीसीआयने म्हटले.नेमकं कारण आलं समोर..

आर अश्विनचीआई आजारी असून त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल केले गेले आहे. आर अश्विन राजकोटहून थेट हॉस्पिटलमध्ये गेला असल्याचे माहिती बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी दिली.

## धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यास हायकोर्टाचा नकार

**मुंबई :** गेल्या काही काळापासून महाराष्ट्रात आरक्षणाच्या मुद्द्यावरून विविध समाज आक्रमक झाले आहे. दरम्यान, धनगर समाजानेही एसटी प्रवर्गात समावेश करून आरक्षण द्यावे, अशी मागणी करत आग्रमक भूमिका घेतली होती. दरम्यान, आरक्षणाच्या मुद्द्यावर मुंबई उच्च न्यायालयाने धनगर समाजाला मोठा धक्का दिला आहे. धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यास हायकोर्टाने नकार दिला आहे. तसेच यासंदर्भात दाखल करण्यात आलेल्या सर्व याचिका फेटाळून लावल्या आहेत. आता धनगर समाजासमोर याबाबत सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा पर्याय शिल्लक राहिला आहे.

धनगर समाजाला एसटी म्हणजे अनुसूचित जमातींमधून आरक्षण मिळावं, यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून आंदोलन सुरू




आहे. मागच्या काही दिवसांत या आंदोलनांची तीव्रता वाढली होती. तसेच धनगर आरक्षणाबाबत कोर्टातही धाव घेण्यात आली होती. धनगर समाजाचा एनटीमधन एसटी प्रवर्गात समावेश व्हावा, अशी मागणी धनगर समाजाकडून करण्यात येत होती. मात्र यासाठी आवश्यक गोष्टींची पूर्तता आणि पडताळणी झालेली नाही, असे सांगत न्यायमूर्ती गौतम पटेल आणि न्यायमूर्ती कमल काथा यांनी धनगर आरक्षणासंदर्भातील याचिका फेटाळून लावल्या आहेत.

धनगर समाजाचा अनुसूचित जमातींसाठी असलेल्या आरक्षणामध्ये समावेश करून नोकरी आणि शिक्षणात आरक्षण देण्याची तरतूद करावी, अशी मागणी याचिकाकर्त्यांकडून करण्यात आली होती.

# निलेश राणे यांच्या गाडीवर दगडफेक

## भास्कर जाधवांच्या कार्यालयासमोर राडा

**चिपळूण :** माजी खासदार नीलेश राणे यांच्या गाडीवर चिपळुणात आमदारभास्कर जाधवयांच्या कार्यालयासमोर दगडफेक करण्यात आली. त्यामुळे चिपळुणात जोरदार राडा झाला असून, राणे आणि जाधव यांचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले आहेत. या राड्यामुळे जमलेला जमाव पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराचा मारा केला आहे. आमदा रभास्कर जाधव यांनी अलिकडेच उद्धव ठाकरे यांच्या कणकवली दौऱ्याप्रसंगी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्यावर टीका केली होती. त्यामुळे संतापलेले माजी खासदार नीलेश राणे यांनी पत्रकार परिषद घेतली आणि भास्कर जाधव यांच्यावर सणसणीत टीका केली. त्यांचा समाचार घेण्यासाठी आपण त्यांच्या मतदार संघातच सभा घेऊ आणि तेथेच



बोलू, असे त्यांनी जाहीर केले. त्यानुसार शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता त्यांची शृंगारतळी (ता. गुहागर) येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. गेल्या दोन तीन दिवसात आमदार भास्कर जाधव यांनी आपल्याला धमक्या येत असल्याचे विधान केले आहे. त्यामुळे संतापलेल्या जाधव समर्थक कार्यकर्त्यांनी बुधवारी चिपळूण पोलीसांना निवेदन देत नीलेश राणे यांची सभा रद्द करण्याची मागणी केली होती.शुक्रवारी दुपारी नीलेश राणे गुहागरकडे जाण्यासाठी निघाले होते. साडेचार ते पाच वाजण्याच्या दरम्यान राणे यांच्या गाडीसह सर्व ताफा आमदार जाधव यांच्य चिपळुणातील कार्यालयासमोरुन जात असताना अचानक त्यांछ्या गाडीवर दगडफेक झाली. त्यामुळे एकच गोंधळ उडाला. दोन्ही बाजूचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले.

## मागण्या पूर्ण होईपर्यंत आमरण उपोषण सुरूच राहणार

# महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा निश्चय

**नागपूर :** जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य होत नाही, तोपर्यंत आम्हीआंदोलनमागे घेणार नाही, असा निश्चय आमरण उपोषणाला बसलेल्या महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. १३ फेब्रुवारीपासून एसटीच्या विभागीय कार्यालयासमोर संघटनेने हेआंदोलनसुरू केले असून आज आंदोलनाचा चवथा दिवस होता संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, एसटी कर्मचाऱ्यांच्या न्याय मागण्यांच्या संबंधाने सरकारकडून ऑक्टोबर २०२३ मध्ये १५ दिवसांत निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. मात्र, चार महिने होऊनही राज्य शासनाने आश्वासनाची पूर्तता न केल्यामुळे संतप्त एसटी कामगार संघटनेने आंदोलनाचे अस्त्र उपसले आहे.या पार्श्वभूमीवर, १३ फेब्रुवारीपासून गणेशपेठमधील एसटीच्या विभागीय कार्यालयासमोर कामगार संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अजय हट्टेवार, विभागीय सचिव प्रशांत बोकडे, पद्माकर चंदनखेडे यांच्या नेतृत्वात प्रवीण पुणेवार, जगदीश पाटमासे, शशिकांत वानखेडे, मीना बोंद्रे, माधुरी वालदे, दिलीप माहुरे, सुनील



झोडे, मनोज बघले, प्रदीप पुराम, रफिक दिवाण, योगेश टवले, मंगल चहांदे, प्रवीण अंजनकर, प्रशांत उमरेडकर, मंगेश कुबडे, गजानन दमकोंडवार, नाना आंग्रेकर, प्रमोद वाघमारे, सुनील मेश्राम, जुगेश चौधरी, मनीष बक्सरे, प्रशांत लांजेवार, प्रफुल वाढोनकर, राजेश खांडेकर, सतीश धकाते, राजेश पेंढारी, मो. इलियाज, विनोद धाबर्डे, युवराज बुले, गजबे, पवन नागपुरे, मुकुंद मुळे आदींनी उपोषण सुरू केले आहे.चार दिवसांपासून सुरू असलेल्या उपोषणाची दखल घेत शासनाने संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना २७ फेब्रुवारीला चर्चेसाठी बोलावले आहे. मात्र, जोपर्यंत आमच्या मागण्या पूर्ण होणार नाही तोपर्यंत हे उपोषण आंदोलन असेच सुरू राहिल, असे आज संघटनेने सांगितले आहे.

# शेतकऱ्यांना हमीभावाची गॅरंटी!

काँग्रेस आघाडी सरकारने स्वामीनाथन आयोगाची स्थापना केली होती. त्याच्या शिफारशी स्वीकारल्या नाहीत संपादकीय - शेतकऱ्यांना हमीभावाची गॅरंटी!ऐंशीच्या दशकामध्ये शरद जोशी यांनी शेतकऱ्यांना संघटित करून बिगरराजकीय चळवळ सुरू केली. प्रत्येक शेतमालाला किमान आधारभूत भाव देण्याची प्रमुख मागणी त्यांनी केली होती. विकासाच्या नावाखालील सर्व योजना बंद करा, ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या हातात पैसा येऊ द्या, विकासाची सर्व कामे गावकरीच करतील, अशी भूमिका ते मांडत होते. शेती तोट्यात जाते, कारण उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव मिळत नाही म्हणून. शेतात राब राब राबूनही उत्पादित मालाला भाव न मिळणे, शेतमालाच्या उत्पादकांपेक्षा दलालच गब्बर होणे, ज्यावेळी चार पैसे हातात येतील असे वाटत असते, नेमके त्याचवेळी त्यांच्या हातातोंडाचा घास ओरबाडला जाणे आणि शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करणे हेशेतकरीवर्गाचेजुने दुखणे आहे. त्यावर आजवर कोणत्याही राजकीय पक्षांच्या सरकारने समाधानकारक उत्तर शोधलेले नाही. ज्येष्ठ कृषी शास्त्रज्ञ डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांनी शेतमालाच्या उत्पादन खर्चावर दीडपट रक्कम आधारभूत किंमत ठरवून ती जाहीर केली जावी, अशी शिफारस केली होती. स्वामीनाथन समितीच्या अहवालातील शिफारशी सरकार स्वीकारत नाही आणि त्याच्या अंमलबजावणीसाठीची यंत्रणा कशी उभी करावी, यावर निर्णय होत नाही. पंजाब, हरयाणा आणि उत्तर प्रदेश; तसेच राजस्थानातील गहू, तांदूळ उत्पादकशेतकरी'चलोदिल्ली'चानारा देऊन सरकारला हाच निर्णय घेण्याचा आग्रह धरत आहेत.- ऊतएठढखडएचएछढकाँग्रेस आघाडी सरकारने स्वामीनाथन आयोगाची स्थापना केली होती. त्याच्या शिफारशी स्वीकारल्या नाहीत. काँग्रेस आघाडीचा पराभव करण्यासाठी प्रचार करताना भाजपने स्वामीनाथन आयोगाच्या



शिफारशीप्रमाणे शेतमालाला हमीभाव देण्याचे आश्वासन दिले; पण सत्तेवर येऊन दहा वर्षे झाली तरी निर्णय घेतला नाही. आता शेतकऱ्यांनी जोरदार तयारी करून आंदोलनाचा रेटा लावला आहे. केंद्र सरकारने हे आंदोलन मोडीत काढण्याच्या इराद्यानेदिल्लीशहरात येणारे रस्ते अडविले आहेत. रस्त्यावर खिळे ठोकले आहेत, बॅरिकेड्स लावले आहेत, रस्ते खोदून अडथळे उभारले आहेत. एवढेच नव्हे, तर आंदोलनात भाग घेणाऱ्यांना विविध प्रकारे धमकावण्यात येत आहे. दुसऱ्या बाजूला केंद्र सरकारचे तीन मंत्री शेतकऱ्यांच्या नेत्यांसोबत चर्चाही करीत आहेत. सरकारने चर्चाच केली नाही, असा आक्षेप कोणी घेऊ नये, यासाठी चर्चेच्या फेऱ्या सुरू ठेवल्या आहेत. शेतकऱ्यांच्या मागण्यांपैकी शेतीमालाला हमीभावाची गॅरंटी द्यावी, हीच प्रमुख मागणी सरकार फेटाळते आहे आणि चर्चा पुढे सरकत नाही. हमीभावाची मागणी घेऊन गेल्या चार दशकांहून अधिक काळ शेतकरी लढा देत आहेत. विद्यमान सरकारच्या राजकीय पक्षांच्या विरोधातील असंतोष म्हणून विरोधी पक्षही शेतकऱ्यांच्या आंदोलनास पाठिंबा देतात; पण तेच पक्ष सत्तेवर येताच शेतीमालाला हमीभाव देण्याची मागणी विसरून जातात.काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनीदेखील हमीभाव देण्याची, तसेच स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी स्वीकारण्याचे आश्वासन दिले आहे. सद्य:स्थितीत तरी या प्रश्नांवर सत्ताधारी गॅरंटी देतील असे वाटत नाही. दरम्यान, लोकसभेची निवडणूक लवकरच जाहीर होणार आहे. ती जाहीर होताच आचारसंहितेमुळे कोणताही निर्णय घेता येणार नाही. निवडणूक आयोगाची खास परवानगी घेऊन निर्णय घेण्याची सोय आहे; पण त्यासाठी सरकार पुढाकार घेईल, असे वाटत नाही. किमान आधारभूत भाव देण्याचा कायदा केला तर तो न देणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करता येईल. कायद्यानेच हमीभावाचे बंधन आले तर शेतमालाला किमान आधारभूत भाव देण्याची गॅरंटी देता येईल, अशी तरतूद करणारा कायदा अस्तित्वात येणे आवश्यक आहे. कापूस, सोयाबीन, खाद्यतेलाच्या उत्पादनासाठी किमान आधारभूत भाव मिळत नाही, ही सार्वत्रिक तक्रार आहे. याशिवाय इतर मागण्यांबाबत सरकार सकारात्मक विचार करताना दिसत नाही. दोन वर्षांपूर्वी शेतकऱ्यांनी आंदोलन केले तेव्हा दाखल करण्यात आलेले गुन्हेगारी स्वरूपाचे गुन्हे मागे घेण्याची मागणी महत्त्वाची आहे. हिंसक कारवायांशिवाय देशद्रोहापर्यंतचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ते लढविताना शेतकरी नेते आणि कार्यकर्त्यांना प्रचंड त्रास होतो. शेतकरी आंदोलकांना हमीभावाची गॅरंटी देण्याची तयारी सरकारच्या पातळीवर दिसत नाही. शेतकरीदेखील मागे हटण्याची शक्यता दिसत नाही. अशा परिस्थितीत निवडणुका जाहीर झाल्या तर चर्चा होण्याची शक्यताही नाही. अशावेळी हमीभावाची गॅरंटी कोणी घ्यायची, हा प्रश्न अनुत्तरितच राहतो.

## पत्रकारांच्या संगणकाचे की-पॅड श्री.छ. खा. उदयनराजे भोसले (महाराज )

पारंब्या या आता आजूबाजूच्या परिसरातही पसरलेले आहेत. त्यामुळे कडक उन्हातही सूर्यप्रकाश खोलवर जाऊ शकत नाही एवढी सावली निर्माण झालेली आहे.



श्री छ खा उदयनराजे भोसले यांची प्रचंड लोकप्रियता अफाट आहे. इंग्रजी भाषेवरील त्यांचे प्रभुत्व व देखणे व्यक्तिमत्व हे प्रथम दर्शनी छाप पाडणारे आहे. त्यामुळे त्याची फारशी चर्चा होताना दिसत नाही परंतु त्यांच्या निर्भीड व जिद्दी आणि धाडसी स्वभावाची मात्र चर्चा होते. प्रसारमाध्यमातून त्यांच्याबद्दल असणारे आकर्षण कधीही लपून राहिलेले नाही. महाराष्ट्रात अनेक मेळावे, आंदोलने व जाहीर सभा होतात पण खासदार उदयनराजे भोसले यांची उपस्थिती ही बातमीची हेडिंग असते. एवढी अफाट लोकप्रियता त्यांना मिळालेली आहे. एखाद्या दगडाला घाव घालून त्याची मूर्ती बनवली जाते परंतु श्री छ खा उदयनराजे यांच्या बाबतीत बोलायचे झाले तर त्यांच्या पाषाणामधील आजूबाजूला असलेले दगडाचे तुकडे बाहेर काढून त्यातील मूर्तीचे दर्शन घडवले आहे. मूर्तीमुळे अनेकांचे भले झालेले आहे किंबहुना श्री छ खा उदयनराजे भोसले यांच्या सावली शेजारी उभे असणाऱ्यांची ही सावली खूप मोठी वाटू लागलेली आहे. पण उदयनराजे बाजूला झाले तर या सावल्यांचे रक्षण दाते उरत नाही हे अनेकांना पटलेले आहे. लहान मुलांचे व चॉकलेटचे आकर्षण असलेल्या महाराजांनी आतापर्यंत लाखो फोटो व सेल्फी काढून दिलेले असतील एखाद्या चित्रपटातील गायक अथवा राजकारणी व्यक्ती पेक्षाही महाराजांची लोकप्रियता अफाट आहे .आजही त्यांच्या लोकप्रिय ते बाबत अनेकांना स्वप्न पडत असतात. त्यांनी घेतलेले निर्णय हे कधी कधी चुकीचे असतात पण त्यांच्या निर्णयावर त्याची लोकप्रियता अवलंबून नाही. हे पुन्हा एकदा सिद्ध झालेले आहे.

काही निर्णय घेताना सल्लागार मंडळी सुद्धा घातक ठरतात. याचा त्यांनी अनुभव घेतलेला आहे. योग्य वेळी किती चुकीचा निर्णय देणे. हे जरी सल्लागारांचे काम असले तरी सल्ला स्वीकारणे की नाही ? हे सर्वस्वी त्यांच्या हातात असते. आगामी लोकसभा निवडणुकीतील संभाव्य उमेदवार म्हणून मतदार सुद्धा त्यांच्याकडे पाहतात. त्यांना मत देण्यासाठी उत्सुक आहेत. आता प्रश्न उरतो तो म्हणजे कोणत्या चिन्हावर ते निवडणूक लढवणार ? यावर सुद्धा बरेच अवलंबून आहे. हे आता स्पष्टपणे नमूद करावे वाटत आहे. त्यांना वाढदिवसाच्या मनापासून शुभेच्छा देताना पत्रकार म्हणून त्यांना विचारलेल्या प्रश्नाचं त्यांनी दिलेले उत्तर हे अभ्यास वर्ग म्हणून पाहिले जाते. आज खरं म्हणजे त्यांच्या कृपेने सातारा शहरात भव्य दिव्य असे पत्रकार व साहित्य भवन उभे राहिलेले आहे .चार मजली या भवन मध्ये डोळ्याची पारणे फिटाली व दिलेला शब्द पाळणारे नेते म्हणून त्यांच्याबद्दल खूप मोठ्या आशा आकांक्षा निर्माण झालेले आहेत. त्यांच्या एकूणच कारकिर्दीमध्ये त्यांच्या कुटुंबीयातील सर्व सदस्य त्याचबरोबर जिवाभावाचे मावळे अशी अनेक नावे घेतली तर वावगं ठरणार नाही. त्याचबरोबर अनेक युवक कार्यकर्ते आज त्यांच्या विजयासाठी परिश्रम घेत आहेत त्यांना निश्चितच यश मिळणार आहे. यासाठी त्यांनीही अभ्यासपूर्ण व वस्तुनिष्ठ माहिती देणाऱ्या सल्लागारांचा सल्ला घ्यावा. एवढीच माफक अपेक्षा आणि पुन्हा एकदा त्यांना शुभेच्छा.......

**- अजित जगताप,**
**सातारा ९९२२२४१२९९**

## जिल्हा रिपब्लिकन सेनेतर्फे दि.२२ रोजी धरणे आंदोलनाचे आयोजन

**सातारा :** जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विविध प्रश्नांच्या मागणीसाठी जिल्हास्तरीय धरणे-आंदोलन गुरुवार दि.२२ रोजी सकाळी ११ वा.रिपब्लिकन सेनेच्यावतीने आयोजन करण्यात आले आहे.अशी माहिती महाराष्ट्र पश्चिम अध्यक्ष चंद्रकांत खंडाईत यांनी दिली आहे.

सर्वसामान्य जनतेच्या मुलभूत प्रश्न शासनाच्या निदर्शनास आणून देणे. त्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी व त्याची सोडवणूक करण्यासाठी लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येणार आहे.

आंदोलनातील प्रमुख मागण्या पुढीललप्रमाणे आहेत.

शासकीय जागेत आज अखेर ज्या ज्या समाज घटकांना विविध योजनांच्या माध्यमातून घरकुले देण्यात आली आहेत. त्या लाभाथ्यर्थ्यांच्या नावे त्या जागेचा उतारा मालकी हक्कात नोंद करण्यात यावी.नव्याने घरकुल योजनांची मंजूरी करताना ज्यांना घरकुलासाठी जागा नाही.अशा कुटुंबास शासनाने गावठाणात जागा उपलब्ध करुन देण्यात यावी.शासन वरचेवर शासकीय जागेत रहिवास अतिक्रमण कायम करण्याचे जाहीर करते. मात्र, प्रत्यक्षात तसे होताना दिसत नाही.तेव्हा शासनाने तातडीने त्याच जागेवर रहिवास अतिक्रमण कायम करण्यात यावे. मागेल त्यास अन्नसुरक्षा योजनेद्वारे अन्न धान्य मिळावे.ते ठरवत असताना २१ व्या शतकाच्या महागाई निर्देशंकानुसारच उत्पन्नाची आकडेवारी ठरविण्यात यावी. नगरपंचायत व नगरपालिका कार्यक्षेत्रात झोपडपट्टी निर्मुलनाची योजना राबवत असताना चटई क्षेत्र किमान ५००

चौ.फुट असावे.ते देत असताना कोणतेही शुल्क आकारण्यात येऊ नये. त्यास मुंबई महानगरपालिकेप्रमाणे नियम लागू करण्यात यावे.घरकुलासाठी शासनाने वेगवेगळ्या समुहासाठी वेगवेगळ्या नावाने योजना सुरू करण्यात आलेल्या आहेत. परंतू त्याचे मुल्यांकनही वेगवेगळ्या स्वरूपाची केली आहेत.ती रद्द करून एकच मुल्यांकन अनुदान रक्कम जाहीर करण्यात यावे. शिक्षण आणि आरोग्य सुविधेचे राष्ट्रीयकरण करण्यात यावे. शासनाने महाराष्ट्र राज्यामध्ये सन - २००६ सालापासून दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजना जाहीर केलेली आहे.परंतु त्या

अटीशर्ती ह्या कालबाह्य असल्याने त्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही. त्यासाठी शासनाने पुनर्वसनाचा कायदा वापरून जमीन उपलब्ध करून या योजनेची अंमलबजावणी निरपेक्षपणे करण्यात यावी. शासनाने अल्पभूधारक व शेतकरी वर्गासाठी विहीर खोदण्यासाठी विविध योजना जाहीर केल्या आहेत. मात्र, त्याच्या अनुदानाची रक्कमही वेगवेगळी ठरविण्यात आली आहे. ती एकच करून किमान चार लाख रूपये करण्यात यावी. आधार नोंदणीकरता जन्म दाखल्याची जी अट लावण्यात आली आहे. ती शिथिल करण्यात यावी.बेरोजगारी व महागाई, बिघडती कायदा व सुव्यवस्था शासनाने नियंत्रणात आणण्यासाठी ठोस उपाय योजना करावी.अशा मागण्यांची पूर्तता शासनाने करावी. दिरंगाई केल्यास तीव्र स्वरूपाची आंदोलने उभारली जातील.असा गंभीर इशाराही देण्यात आलेला आहे.



**डॉ.आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण अभिवादन करताना रिपब्लिकन सेनेचे खंडाईत व पाटणची टीम.**

## इंदोर येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय टॅटू स्पर्धेत पुण्यातील संदिप वाघमारे यांच्या टॅटूस पहिला क्रमांक

**हडपसर :** इंदोर येथे आयोजित करण्यात आलेल्या इंक मी आंतरराष्ट्रीय टॅटू मोहत्सवात हडपसर येथील पुण्याचा टॅटू अर्टिस्ट संदिप अनिल वाघमारे यांनी काढलेल्या श्रीगणेशाची मुर्ती व बुध्द मूर्ती प्रतिमां टॅटूला पहिला क्रमांक मिळला असून संदिप वाघमारे यांनी सुंदर अशा काढलेल्या चित्राला आंतरराष्ट्रीय टॅटू मोहत्सवात त्यांनी प्रथम क्रमांक आल्याने महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. संदिप वाघमारे यांचा सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.



इंदोर येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय टॅटू मोहत्सवात देशातून परदेशातून जवळपास दोनअडिचशे टॅटू कलाकार स्पर्धेत सहभागी झाले होते.या मोहत्सवात त्यांनी काढलेले तथागत भगवान गौतम बुद्ध आणि श्री गणेशाची मूर्तीच्या टॅटूने सर्वांचे लक्ष वेधले. आणि या आंतरराष्ट्रीय टॅटू मोहत्सवात पहिला क्रमांक मिळाला.

आंतरराष्ट्रीय टॅटू मोहत्सवात शेकडो कलाकार सहभाग घेतलेले होते. पुण्यातील भिक्षु टॅटू स्टुडिओचे संदिप वाघमारे हे फारसं शिक्षण घेतलेले नाही परंतु घरची प्रतिकुल परस्थिती असून देखील कोणाचा आधार नसताना लहानपणापासून विविध प्रकारचे वहीवर चित्र रेखाटत तो आपली कला टॅटू काढण्याकडे वळवली , छंद, मेहनत आणि जिद्द याच्या जोरावर तो टॅटूच्या माध्यमातून तरुणांच्या अंगावर ,हातापायावर,दंडावर लहानशा मशीनपासून टॅटू काढण्यास सुरुवात केली.

## स्वच्छ मुख अभियान अंतर्गत दंततपासणी शिबीर संपन्न

**सातारा :** शासनाच्या स्वच्छ मुख अभियान अंतर्गत दिनांक १३ फेब्रुवारी, २०२४ रोजी जीरश्र डींसशी ऊू साजरा करण्यात आला. या अनुषंगाने आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा येथे व्याख्यान व दंततपासणी शिबीराचे आयोजन छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा येथील अधिष्ठाता डॉ. रविंद्रनाथ चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. सदरील दंततपासणी शिबीराचा ६७ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

जीरश्र डींसशी मध्ये केल्या जाणाऱ्या शस्त्रक्रिया व कर्करोग आणि मौखिक आरोग्य या विषयावर डॉ. ऐश्वर्या खाचणे अधिव्याख्याता दंतशास्त्रविभाग यांनी व्याख्यान दिले. तसेच डॉ. निलम सोनावणे, डॉ. प्रियांका बाबर यांनी दंततपासणी करून दातांची निगा कशी राखावी या बद्दल माहिती दिली.

उपरोक्त शिबीराच्या आयोजनाकरीता छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा येथील डॉ. योगेश गवळी, डॉ. ऐश्वर्या खाचणे, डॉ. निलम सोनावणे, डॉ. प्रियांका बाबर तसेच आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा येथील प्राचार्या. डॉ. नलवडे व प्रा. धोंडगे यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

# जावलीतील तलाव बंधाऱ्यांची दुरुस्ती व्हावी: शेतकऱ्यांची मागणी

## तालुक्यात नवीन बंधारे उभारावेत: शेतकरी,ग्रामस्थांची मागणी

**कुडाळ :** जावली तालुक्यातील कुडाळ,शेते,सोमर्डी,मस्वे, हुमगाव,करहर,मेढा,आंबेघर,केळकर इ.पंचक्रोशीतील नदी व ओढ्यावर असणारे लघु बंधारे तसेच छोटे-मोठे तलाव यामध्ये वर्षानुवर्ष गाळ साचलेला असून गळतीचे प्रमाण वाढले आहे.यामुळे पाणीसाठा मर्यादित होत आहे.याचा परिणाम भूजलपातळीवरही झालेला असून यावर्षी कमी पर्जन्यमान झाल्याने दुष्काळजन्य परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे.अशा परिस्थितीत महसूल प्रशासनाकडून बंधारे,तलाव यातील गाळ उपसल्यास पाणी साठवण्यास मदत होईल.त्यामुळे जावली महसूल प्रशासनाकडून गाळ उपसून व नवीन जास्तीत जास्त बंधारे उभारण्यात यावेत अशी मागणी सध्या जावली तालुक्यातील शेतकरी वर्गातून होत आहे.

दिवसेंदिवस पावसाचे प्रमाण घटत असून यावर्षी जावली तालुक्यामध्ये पावसाचे कमी पर्जन्यमान पाहायला मिळाले.यावर्षी जावली तालुक्यामध्ये अल्प प्रमाणात पाऊस झाला असल्याने काही मंडल दुष्काळग्रस्त जाहीर झाले असून त्यांना दुष्काळ सवलती अद्यापही मिळाल्या नाहीत.तसेच पाण्याची टंचाईच्या





झळा फेब्रुवारीतच जाणवायला सुरुवात झाल्या आहेत.याचा जावळीतील नागरिकांना व शेती पिकांना त्रास जाणवू लागला आहे.सध्या धोमच्या उजव्या कॅनॉलचे दुसरे रोटेशन नुकतेच पूर्ण झाले आहे.कालव्याचे पाणी गेल्याने सध्या नदी व ओढ्याच्या पाणी पातळीतही मोठी घट झालेली दिसून येत असून पाण्याअभावी शेतात उभे असणारे पिक अडचणीत आले आहे. त्याचप्रमाणे दरवर्षी धोम पाटबंधारे विभागाकडून आठ रोटेशन शेतकऱ्यांना दिली जात होती. परंतु यावर्षी रब्बी दोन व उन्हाळी दोन असे मिळून चारच रोटेशन सोडण्यात येणार असल्याचे धोम पाटबंधारेविभाग कडून यापूर्वीच सांगण्यात आले असल्याने पाण्याअभावी शेती व्यवसाय अडचणीत आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अनेक अडी-अडचणींचा सामना करावा लागत आहे.

जावली तालुक्यांमध्ये अनेक गावामध्ये लोकसहभागातून व काही वर्षांपूर्वी प्रशासनामार्फत ओढ्यावर बंधारे तसेच काही ठिकाणी पाझर तलाव बांधण्यात आले होते.सध्या या बंधाऱ्यांच्या अवती-भोवती झाडे-झुडपांनी विळखा घातला आहे.तसेच ओढ्यावर बांधण्यात आलेल्या बंधाऱ्याच्या लगत मोठ्या प्रमाणात पाण्याबरोबर वाहत आलेला गाळ साचला असून पाणी साठवण क्षमता कमी झाली आहे.त्यामुळे बंधाऱ्यात पाणी शिल्लक राहत नसल्याचे शेतकऱ्यांकडून सांगितले जात आहे.तसेच या जुन्या बंधाऱ्यांची उंची व रुंदी वाढवण्यात यावी.ज्या छोट्या मोठ्या व डोंगर कपाऱ्यात असणाऱ्या गावात पाणीटंचाईची भीषणता जाणवत आहे तेथे प्रामुख्याने नवीन बंधारे बांधण्यात यावेत अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.या सर्व बाबींचा प्रशासनाकडून विचार करावा आणि तातडीने तलाव, बंधाऱ्यांमधील असणारा गाळ लवकरात लवकर महसूल प्रशासनाकडून उपसण्यात यावा अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरू लागली आहे.

यावर्षीच्या कमी पर्जन्यमानामुळे मार्च,एप्रिल,मे महिन्यात जाणवणारी पाणीटंचाई फेब्रुवारीतच जाणवू लागली आहे. भविष्यातील पाणीटंचाई दूर व्हावी यासाठी प्रशासनाकडून ठोस पावले उचलण्यात यावीत.आवश्यक ठिकाणी तलाव व बंधारे बांधण्यात यावेत अशी मागणी नागरिक व शेतकरी करत आहेत. वळवाचा पाऊस होण्याअगोदर या तलाव व बंधाऱ्यांतील गाळाचा उपसा केला जावा.

यामुळे निश्चितच भविष्यात जावली तालुक्यावर येणारे पाणीटंचाईचे संकट दूर होण्यास मदत होईल.पाणीसाठा झाल्याने शेतीलाही याचा फायदा होईल.

तसेच कुडाळ व पंचक्रोशीतील ४० ते ४५ सिंचन विहिरीचे प्रस्ताव पंचायत समिती जावलीकडे गेले असून सुद्धा आजपर्यंत एकाही नूतन विहिरीला मंजुरी मिळाली नसल्याचे शेतकऱ्यांकडून बोलले जात आहे. अशी परिस्थिती असल्यामुळे शेतकऱ्यांनी दुष्काळाचा सामना कसा करावा हाच प्रश्न शेतकऱ्यांपुढे 'आ'वासून उभा राहिला आहे. तलाव व बंधाऱ्यातील गाळ उपसा वेळेत झाला तर ऐन उन्हाळ्यात बंधाऱ्या लगतची शेती हिरवीगार झाल्या शिवाय राहणार नाही.

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२१, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कढनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य राज्यस्तरीय सेना केसरी सामने

# हडपसरमध्ये रंगला राज्यस्तरीय सेना केसरी कुस्ती महास्पर्धा



**हडपसर :** हडपसर मध्ये हांडेवाडीरोड वरील जेएसपीएम कॉलेज स्व.हिन्दु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे फुटबॉल स्टेडियमवर

राज्यस्तरीय सेना केसरी महा स्पर्धा आयोजित करण्यात आली असून कुस्ती सामन्याचा उदघाट्न समारंभ थाटामाटात संपन्न झाला. प्रसिद्ध उद्योजक पुनीत बालन, अप्पर पोलीस अधिक्षक ट्रिपल महाराष्ट्र केसरी विजय चौधरी, हिंदकेसरी अभिजीत कटके, पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे यांच्या प्रमुख पाहुणे उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

चार दिवसीय पार पडत असलेल्या या सामन्यात, राज्यभरातून अनेक मल्लांनी या स्पर्धेत सहभाग घेतला आहे, लोकाश्रय असणाऱ्या कुस्तीला राजाश्रय मिळवून देण्यासाठी तसेच मल्लांचा यथोचित सन्मान करण्यासाठी रांगड्या मातीतील हे सामने आयोजित करण्यात आल्याचे कुस्ती स्पर्धेचे आयोजक शिवसेना शहरप्रमुख प्रमोद नाना भानगिरे यांनी सांगितले, तब्बल ६०० मल्ल या स्पर्धेत सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शहरप्रमुख प्रमोद नाना भानगिरे संकल्पनेतून, आयोजित करण्यात आलेल्या चार दिवसीय भव्य सेना केसरी राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा २०२४ ही स्पर्धा हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे फुटबॉल मैदान, जे. एस. पी. एम. कॉलेज शेजारी, हांडेवाडी,हडपसर पुणे येथे अत्यंत चुरशीची अशी स्पर्धा मोठ्या दिमाखात पार पडत आहे.

विशेष म्हणजे वियजी मल्लांसाठी ठेवण्यात आलेली, बक्षीसे हे आकर्षणाचा विषय ठरत आहेत. यामध्ये प्रथम क्रमांक आलेल्या मल्लास रोख रक्कम ५ लाख रुपये ,व चांदीची गदा व बुलेट मिळणार आहे. तर द्वितीय क्रमांकास ३ लाख व सन्मान चिन्ह, तृतीय क्रमांकास २ लाख व सन्मान चिन्ह व चतुर्थ क्रमांकास १ लक्ष व सन्मान चिन्ह अशा स्वरूपाची बक्षिसे मिळणार आहेत. तसेच विविध वजनीगटातील स्पर्धकांना ३५ लाखांची बक्षिसे प्रदान करण्यात येणार आहेत

दरम्यान,या स्पर्धेला महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे मोठे मार्गदर्शन लाभणार आहे,यावेळी पुणे महानगरपालिकेचे उपायुक्त प्रसाद काटकर,बाळासाहेब ढवळे, उद्योगपती बाळासाहेब भानगिरे, उपमहाराष्ट्र केसरी अशोक माने, हरियाणाचे राजू पैलवान, अंकुश मामा घुले ,राजेंद्र जरांडे, मोहन हगवणे, राजेंद्र घुले, नानासाहेब पठारे,मकरंद केदारी,राजेंद्र भानगिरे,निलेश माझीरे,श्रीकांत पुजारी,लक्ष्मण आरडे, अभिजीत बोराटे, सुदर्शना त्रिगुणाईत,श्रद्धा शिंदे, सचिन थोरात, नितीन लगस व मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते

या स्पर्धेचे बक्षीस वितरण महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या हस्ते १८ फेब्रुवारीला होणार आहे

# मनोज जरांगे यांनी उपोषण थांबवावे; दलित मराठा ऐक्यासाठी पुढे यावे : रामदास आठवले

## राजकारणात यायचे असेल तर मनोज जरांगे यांनी रिपब्लिकन पक्षात येऊन नवा इतिहास घडवावा



**मुंबई** - मराठा आरक्षण लढ्याचे क्रांतियोद्धे मनोज जरांगे यांचा जीव लाखो मराठा तरुणांना नवजीवन देणारा जीव आहे. त्यांनी आपला जीव धोक्यात घालू नये. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी सरका मराठा समाजाच्या पाठीशी आहे.त्यामुळे मनोज जरांगे यांनी तातडीने उपोषण थांबवावे त्यांची मराठा समाजाला ;महाराष्ट्राला गरज आहे असे आवाहन आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले.

मनोज जरांगे यांनी निवडणूक लढण्याबाबतचे आवाहन करण्यात आले आहे असे पत्रकारांनी आज विचारल्या नंतर ना.रामदास आठवले यांनी मनोज जरांगे यांना रिपब्लिकन पक्षात येण्याचे आवाहन केले. मनोज जरांगे यांनी निवडणुकीचे राजकारण करावे की करू नये हा त्यांनी निर्णय घ्यावा मात्र राज्यात दलित मराठा समाजाचे ऐक्य करण्यासाठी मनोज जरांगे यांची महाराष्ट्राला गरज आहे.

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांची संकल्पना असणारा रिपब्लिकन पक्ष हा राजकारणापेक्षा सामाजिक सांस्कृतिक भेदभावाची लढाई लढणारा पक्ष आहे.या सामाजिक परिवर्तनाच्या लढाईत पुढे येऊन मनोज जरांगे यांनी एक आदर्श उभा करावा. रिपब्लिकन पक्षात येऊन भेदभाव निर्मूलनाच्या लढाईला बळ देऊन राज्यात नवा इतिहास घडवावा. दलित मराठा ऐक्यातून महाराष्ट्रात नवा इतिहास घडेल असे आवाहन आज ना.रामदास आठवले यांनी मनोज जरांगे यांना केले.

मनोज जरांगे यांनी केलेल्या मागणी नुसार सगेसोयरे यांना आरक्षण देण्याचा निर्णय राज्य सरकार ने घेतला आहे.मराठा आरक्षणासाठी विधानसभेचे अधिवेशन आयोजित केले आहे. सरकार मराठा आरक्षण साठी अनुकूल आहे. आम्ही तर सुरुवातीपासून मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे या मागणीला पाठिंबा दिला आहे.आम्हीही अनेक आंदोलने केली आहेत. आंदोलनात सबुरीने घेतले पाहिजे. आम्ही १७ वर्षे नामांतर लढा नेटाने लढलो आणि जिंकलो. त्यामुळे मनोज जरांगे यांनी थोडे सबुरीने घेतले पाहिजे. स्वतःच्या जीवाची काळजी घ्यावी.

# सोपान घोलप यांचे निधन

**पाटण :** पिंपळोशी ता.



पाटण येथील सोपान आबा घोलप

यांचे सोमवार दिनांक १२ रोजी वयाच्या ६७ व्या वर्षी आकस्मित निधन झाले. ते मनमिळावू व प्रेमळ स्वभावाचे होते, धार्मिक, सामाजिक कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग होता.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, विवाहीत मुलगी , जावई , सूना, नातवंडे असा परिवार आहे.

धम्म दीप सेवा संघाचे ते मार्गदर्शक होते .

रक्षविसर्जन रविवार दिनांक १८ रोजी सकाळी १० वाजता होणार आहे.

# मराठा आरक्षणाबाबत राजू भोर यांचा उपोषण सोडण्यास नकार

## आमदार व तहसीलदार यांची विनंती अमान्य




**नारायणगाव :** मराठा समाजाला आरक्षण मिळावे व त्याचे कायद्यात रूपांतर व्हावे यासाठी मराठा नेते मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी हिवरे तर्फे नारायणगाव (ता.जुन्नर) येथील युवक राजू भोर हा गेली सहा दिवसांपासून आमरण उपोषणाला बसला आहे. वीस तारखेला मराठा आंदोलनासंदर्भात विशेष अधिवेशन बोलवण्यात येणार असून आपण उपोषण मागे घ्यावे यासाठी जुन्नर तालुक्याचे आमदार अतुल बेनके यांनी राजू भोर यांना विनंती करण्यासाठी आज हिवरे तर्फे नारायणगाव येथे उपोषण स्थळी भेट दिली. मात्र आपण उपोषण सोडणार नसल्याचे भोर यांनी सांगितले. यावेळी आमदार अतुल बेनके यांच्यासह तहसीलदार रवींद्र सबनीस, तसेच स्थानिक ग्रामस्थ विकास भोर, नितीन भोर, शिवदास विघाटे, संतोष खोखराळे,नारायण भोर, गावातील ज्येष्ठ नागरिक महिला आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी नेमके आमदार अतुल बेनके, तहसीलदार सबनीस तसेच तेथील गावकऱ्यांनी देखील उपोषणकर्ता राजू भोर यांना उपोषण सोडण्याचे आवाहन केले.

मात्र आपण प्रथम आमचे नेते मनोज जरांगे यांचे उपोषण सोडवा त्यानंतरच मी उपोषण मागे घेईल अशी भूमिका घेतली यावेळी डॉक्टर प्रवीण शिंदे यांनी राजू भोर यांची तपासणी करून यापुढेही जर उपोषण चालू ठेवले तर आपल्या किडनीसह इतर अवयवांना धोका होऊन तब्येत खालवली जाईल अशी माहिती दिली तरी राजू मोरे यांनी उपोषण सोडण्यास नकार दिला.

# कुशल मनुष्यबळ आणि रोजगार संधी यांच्यातील समन्वयासाठी महापालिका प्रयत्नशील: आयुक्त शेखर सिंह



**पिंपरी:** बदलत्या काळानुसार रोजगार निर्मिती आणि शिक्षण क्षेत्रातील आव्हाने वाढत आहेत. त्याला अनुसरून, शहरातील युवकांना रोजगार संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी महापालिकेच्या वतीने विविध योजना राबविण्यात येतात. उद्योग क्षेत्रामध्ये कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. तसेच विद्यार्थी देखील त्यांच्या उत्तम करिअरसाठी प्रयत्नशील आहेत. औद्योगिक क्षेत्र आणि विद्यार्थी यांच्यामधील दुवा म्हणून काम करण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येतील. पिंपरी चिंचवड शहरामध्ये अनेक महाविद्यालये आहेत. त्यामध्ये संपूर्ण देशभरातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यामध्ये ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर्सची महत्त्वाची भूमिका आहे, असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी केले.

दि. १६ फेब्रुवारी रोजी ऑटो क्लस्टर, चिंचवड येथे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्या उपस्थितीत ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर्स यांचे प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या माध्यमातून उपस्थित अधिकारी यांनी आयुक्तांशी थेट संवाद साधला. यावेळी समाज विकास विभाग प्रमुख अजय चारठाणकर, पीसीएससीएलचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, मुख्य माहिती तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, क्रीडा विभाग प्रमुख मिनिनाथ दंडवते, विशेष अधिकारी किरण गायकवाड आणि विविध महाविद्यालयांचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर्स, पीसीएमसी स्मार्ट सारथी टीमचे बिनिश सुरेंद्रन, आशिष चिकणे, जस्टीन मॅथ्थू, किरण लवटे आदी प्रतिनिधी उपस्थित होते.

या कार्यक्रमामध्ये ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर्सनी शहराचा विकास, रोजगार निर्मितीशी संबंधित समस्या व उपाय, त्या संदर्भात भूमिका, इत्यादी विषयांवर विचार विनिमय करण्यात आले. तसेच, विविध उपस्थित प्रश्नांना आयुक्त शेखर सिंह यांनी समर्पक उत्तरे दिली. विद्यार्थ्यांनी उद्योग क्षेत्राला आवश्यक असणारी कौशल्ये आत्मसात करावीत, महापलिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध कौशल्य विकास प्रशिक्षणांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात यावी, जास्तीत जास्त युवकांना रोजगार संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रयत्न करण्यात यावेत, विद्यार्थ्यांना इंटर्नशिपची संधी उपलब्ध करून देण्यात यावी, अशा अनेक विषयांवर यावेळी संवाद साधण्यात आला. या कार्यक्रमामध्ये पिंपरी चिंचवड, पुणे आणि मुंबईमधून एकून ८० ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर्स उपस्थित होते. पीसीएमसी स्मार्ट सारथीच्या वतीने कार्यक्रमाचे प्रास्ताविक करण्यात आले. कार्यक्रमास ट्रेनिंग आणि प्लेसमेंट ऑफिसर्स, विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

[redacted]

## चोरीचा प्रयत्न केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा :** चोरीचा प्रयत्न केल्याप्रकरणी एकाविरोधात सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १५ रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास वर्ये, ता. सातारा येथील गोपाळकृष्णा ऑइलटेक मिल वरील खिडकीच्या व दरवाज्याच्या स्लाइडिंग च्या कट आउट चोरी करून घेऊन जाताना संजय विजय जाधव रा. शेंद्रे, ता. सातारा हा सापडला. अधिक तपास पोलीस हवालदार कुमठेकर करीत आहेत.

## राहत्या घरातून एक जण बेपत्ता

**सातारा :** राहत्या घरातून एक जण बेपत्ता झाल्याची फिर्याद सातारा तालुका पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १४ रोजी करंडी ता. सातारा येथील मंगेश लक्ष्मण जाधव हे कोणास काही एक न सांगता निघून गेले आहेत. अधिक तपास पोलीस हवालदार निकम करीत आहेत.

## सातारा शहरासह तालुक्यातील चार जुगार अड्ड्यांवर छापे

**सातारा :** सातारा शहरासह तालुक्यातील चार जुगार अड्ड्यांवर पोलिसांनी छापे टाकून ४१९० किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सातारा शहरातील वाढे फाटा येथे दीपक बाळकृष्ण चौधरी राहणार सातारा याच्याकडून ९५० रुपये जुगाराचे साहित्य हस्तगत करण्यात आले आहे.

दुसऱ्या घटनेत सातारा शहरातील एसटी स्टँड परिसरातून दीपक गजानन देशमुख राहणार शनिवार पेठ सातारा याच्याकडून ८२० रुपये रोख व जुगाराचे साहित्य हस्तगत करण्यात आले आहे.

तिसऱ्या घटनेत कोडोली नाका येथील पालवी हॉटेलच्या पाठीमागे जुगार घेत असलेल्या शंकर आत्माराम भोसले राहणार विलासपूर सातारा याच्याकडून ११८० रुपये रोख व जुगाराचे साहित्य हस्तगत करण्यात आले आहे.

चौथ्या घटनेत लिंब, ता. सातारा येथून नदीम नासिर सय्यद रा. बुधवार पेठ सातारा याच्याकडून बाराशे चाळीस रुपये रोख व जुगाराचे साहित्य हस्तगत करण्यात आले आहे.

## अवैध दारू विक्री प्रकरणी महिलेवर कारवाई

**सातारा :** अवैधरित्या दारू विक्री केल्याप्रकरणी एका महिलेवर सातारा तालुका पोलिसांनी कारवाई केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १५ रोजी अडीच वाजण्याच्या सुमारास लिंब, ता. सातारा गावच्या हद्दीतील लिंब ते गोवे जाणाऱ्या रस्त्यावर एक महिला अवैधरित्या दारू विक्री करताना आढळून आली. तिच्याकडून २८७० रुपये किंमतीच्या देशी दारूच्या बाटल्या हस्तगत करण्यात आल्या आहेत.

## लोकसभा निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी आवश्यक सुरक्षा उपाययोजना करा : डॉ.सुहास दिवसे

**पुणे :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक शांततेच्या वातावरणात आणि पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी सुरक्षेच्यादृष्टीने खबरदारीच्या उपाययोजनांवर भर द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांनी दिले. सर्व यंत्रणांनी एकत्रितपणे काम केल्यास निवडणुका मुक्त वातावरणात पार पडतील, असा विश्वासही यावेळी त्यांनी व्यक्त केला.

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेबाबत दूरदृष्य प्रणालीद्वारे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या बैठकीस अपर जिल्हाधिकारी अजय मोरे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर, तर दूरदृष्य प्रणालीद्वारे जिल्ह्यातील सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, वरिष्ठ पोलीस अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, उपविभागीय अधिकारी उपस्थित होते.

डॉ.दिवसे म्हणाले, सुरक्षाविषयक उपाययोजनांबाबत संबंधित विभागांतर्गत आणि विविध विभागातही माहितीचे आदानप्रदान नियमितपणे करावे. मागील सार्वत्रिक निवडणुकांमध्ये जमा केलेली शस्त्रे, दाखल झालेले निवडणूक विषयक गुन्हे, गुन्हे दाखल झालेले व्यक्ती आदींची माहिती तयार ठेवावी आणि या माहितीचे विश्लेषण करून अशा गुन्ह्यांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी कार्यवाही करावी. गंभीर गुन्हे घडलेल्या भागात पोलीस व महसूल अधिकाऱ्यांनी एकत्रितपणे भेटी द्याव्यात, आवश्यक ठिकाणी प्रतिबंधात्मक कार्यवाही करावी.

अतिसंवेदनशील आणि संवेदनशील मतदान केंद्रात नागरिकांना शांततेत आणि निर्भयपणे मतदान करता यावे यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाय आतापासूनच योजावे. कायदा व सुव्यवस्थेसंदर्भातील सर्व अहवाल त्वरीत सादर करावे. निवडणुकीत कोणतीही अप्रिय घटना घडणार नाही यादृष्टीने यंत्रणेची सज्जता असावी,

# शुभांगी लोणकर यांच्याकडे सोपवला दौंड तालुका वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयाचा अतिरिक्त पदभार



**पाटस :** दौंड तालुका वनपरिक्षेत्र अधिकारी कल्याणी गोडसे यांना बेकायदा वृक्षतोड आणि कोळसा भट्ट्या प्रकरणी तडकाफडकी निलंबित करण्यात आल्यानंतर आता त्यांच्या जागी बारामती तालुका वनपरिक्षेत्र अधिकारी शुभांगी लोणकर यांच्याकडे दौंड तालुका वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयाचा अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे. दौंड तालुक्याच्या पूर्व भागातील मलठण ,राजेगाव, वाटलुज, नायगाव या भीमा नदीच्या पट्ट्यात वन हद्दीच्या क्षेत्रात आणि उजनी संपादन केलेल्या क्षेत्रात मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या बेकायदा वृक्षतोड आणि कोळसा भट्ट्या खुलेआम सुरू होत्या. वन विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या संगनमतानं खुलेआम हा व्यवसाय तेजीत सुरू होता.असा आरोप आणि लेखी तक्रार ही ग्रामस्थांनी दौंड तालुका वनपरिक्षेत्राधिकारी कल्याणी गोडसे यांच्याकडे केला होता. मात्र त्यांनी या प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आणि संबंधित आरोपींना कोणत्याच प्रकारची कारवाई न केल्याने ग्रामस्थांनी पुणे वन विभागाचे सहाय्यक उपवनसंरक्षक दिपक पवार यांच्याकडे लेखी तक्रार केली. दरम्यान, बेकायदा वृक्षतोड आणि कोळसा भट्टयांचा खुलेआम सुरू असलेल्या काळाबाजार याबाबत नवराष्ट्र ने सडतोड पणे वृत्त मालिका सुरू केली. याची दखल घेत पुणे वनविभागाचे सहाय्यक उपवनसंरक्षक दिपक पवार यांनी बुधवारी (दि.७) घटनास्थळी भेट देऊन प्रत्यक्षात पाहणी केली. घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर त्यांनी तत्काळ घटनास्थळी पंचनामा करीत संबंधित व्यक्तींवर कारवाई करण्याचे आदेश दिले. यामध्ये

# पिंपोडे बुद्रुक युवकाचा निघृण खून, परिसरात चर्चेला उधाण



**पिंपोडे बुद्रुक :** येथे ज्वारी काढण्यासाठी गेलेल्या युवकाचा डोक्यात व तोंडावर अज्ञाताने खलबत्याच्या ठोंब्याने घाव घालून निर्घृण खून केला. भर दुपारी बाराच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. त्यामुळे गावात खळबळ उडाली असून चर्चेला उधाण आले आहे.भगवान मच्छिंद्र सपकाळ (वय २४, रा. पिंपोडे बुद्रुक) असे मृत तरुणाचे नाव आहे.

याबाबत घटनास्थळावरून मिळालेली माहिती अशी, की गावाच्या उत्तरेला दोन किलोमीटरवर परगणा वस्ती आहे. वस्तीच्या अलीकडे नव्याने बांधलेल्या श्री घुमाई देवी मंदिरापासून हाकेच्या अंतरावर मळा नावाच्या शिवारात तरुण मुलगा भगवान सपकाळ कालपासून शेतात ज्वारीची काढणी करत होता. आज सकाळी नऊच्या सुमारास तो एकटाच ज्वारी काढण्यासाठी गेला होता. दरम्यान दुपारी बारा वाजता त्याची आई जेवणाचा डबा घेऊन गेली. यावेळी तिने शेतात भगवानचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडलेला पाहिला. बघता बघता ही बातमी गावात सर्वत्र पसरली.

वाठारचे सहायक पोलिस निरीक्षक अशोकराव हुलगे कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर साताऱ्याहून ठसे तज्ञ आणि श्वान पथकाला पाचारण करण्यात आले. पोलिसांनी श्वानाला शेतात पडलेल्या खलबत्त्याच्या ठोंब्याचा वास देऊन मारेकऱ्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मात्र श्वान परगणा वस्तीपर्यंत जाऊन घुटमळले. मयत भगवान हा गरीब कुटुंबातील मुलगा होता. त्याचे वडील मच्छिंद्र आणि आई शेती व मोलमजुरी करून उदरनिर्वाह करतात. भगवान व त्याचा लहान भाऊ अभिजीत हा शेतीकामात त्यांना मदत करत होते. भगवानने गावातील खासगी दवाखान्यात मदतनीस म्हणून काम केले होते. भगवानने एक वर्षापूर्वी लग्न केले होते, मात्र त्याच्यापाशी न नांदता त्याच्या पत्नीने दुसरे लग्न केल्याचे समजते.

सायंकाळी येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करून रात्री शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. सहायक पोलिस निरीक्षक अशोकराव हुलगे अधिक तपास करत आहेत. सदर घटनेमुळे परिसरात खळबळ माजली असून या तरुणाचा नेमका कोण कोणत्या कारणाने झाल याचा शोध पोलीस तपासानंतर उघडकीस होईल तोपर्यंत चर्चेला उधाण आलेला आहे.

# महावितरणची वसूली मोहीम;बारामती मंडलात ३०५ कोटींची थकबाकी

**बारामती :** महावितरणच्या बारामती मंडलांतर्गत भोर, पुरंदर, बारामती, दौंड, शिरुर व इंदापूर तालुक्यात बिगरशेती वीजग्राहकांची थकबाकी ३०५ कोटींवर गेली असून, ती वसूल करण्यासाठी कंपनीने धडक वसूली मोहीम राबविण्यास सुरुवात केली आहे. थकबाकीदार ग्राहकांनी त्यांच्या चालूसह थकीत वीजबिलांचा भरणा तात्काळ करावा; अन्यथा वीजपुरवठा खंडित करण्यात येईल असा इशारा महावितरणने दिला आहे. बारामती मंडलात महावितरणचे बारामती, केडगाव व सासवड असे तीन विभाग आहेत. बारामती विभागात थकबाकीदार ग्राहकांची संख्या ५१०५० इतकी असून, त्यांच्याकडे १८३ कोटी थकले आहेत. त्यात घरगुती ४१९३२ (३ कोटी ६१ लाख), व्यावसायिक ४६९८ (१ कोटी ५ लाख), लघुदाब औद्योगिक ५८८ (६४ लाख), दिवाबत्ती १६७९ (१२१ कोटी ४९ लाख), सार्वजनिक पाणीपुरवठा ३९९ (५४ कोटी ८० लाख), सार्वजनिक सेवा १३३३ (१ कोटी ३९ लाख) व इतर वर्गवारीच्या ४२१ ग्राहकांकडे १० लाख असे मिळून थकबाकीचा आकडा १८३ कोटींवर गेला आहे. केडगाव विभागात थकबाकीदार ग्राहकांची संख्या ६२१४३ इतकी असून, त्यांच्याकडे ९० कोटी २२ लाख थकबाकी आहे. यामध्ये घरगुती ५२६८६ (६ कोटी ८२ लाख), व्यावसायिक ५०७४ (१ कोटी ७९ लाख), लघुदाब औद्योगिक १०४५ (१ कोटी ६६ लाख), दिवाबत्ती ११३८ (४४ कोटी १४ लाख), सार्वजनिक पाणीपुरवठा ४२४ (३३ कोटी ७ लाख), सार्वजनिक सेवा १२२८ (२ कोटी ४० लाख) व इतर वर्गवारीच्या ५४८ ग्राहकांकडे ३२ लाख असे मिळून थकबाकीचा आकडा ९० कोटींवर गेला आहे.

# व्यापाऱ्यांचा व्यवहार बंद ठेवून मराठा समाजाच्या मागणीला पाठिंबा

**कुरुंदवाड :** मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन सुरू असून त्यांची प्रकृती खालावली आहे. सरकारने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी तात्काळ अधिवेशन घेऊन मागासवर्गीय आयोगाकडे अहवाल सादर करावा आणि आरक्षण देण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू कराव्यात यामागणीसाठी कुरुंदवाड शहर कडकडीत बंद पाळण्यात आले होते. व्यापाऱ्यांनी आपले व्यवहार बंद ठेवून मराठा समाजाच्या मागणीला पाठिंबा दिला.



कुरुंदवाड पालिका चौकात निदर्शने करताना सकल मराठा समाज बांधव.



कुरुंदवाड शहर जरांगे पाटील यांच्या यांची प्रकृती खालवल्याने राज्य सरकारच्या निषेधार्थ कडकडीत बंद.

महिला आघाडी ही अक्रमक झाली असून राज्य सरकारने मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत आश्वासनाची मालिका सुरू केली आहे. समाजाची घोर थट्टा करून जरांगे पाटील यांच्या जीविताशी खेळ सुरू केला आहे.आमच्या योध्याला रक्त सांडायला लावले आहे. सरकारने विलंब न लावता आरक्षणाची कायदेशीर पूर्तता करावी अन्यथा या सरकारला बांगड्यांची आहेर दिल्याशिवाय आम्ही महिला गप्प बसणार नाही असा इशारा सुजाता डकरे, कांचन लाड यांनी दिला.

कुरुंदवाड शहर सकल मराठा समाजाच्यावतीने मनोज रंगे पाटील यांची परिस्थिती खालावल्याने कुरुंदवाड शहर बंदची हाक देण्यात आली होती त्यानुसार व्यापाऱ्यांनी आपले सर्व व्यवहार बंद ठेवले होते कुरुंदवाड शहरात दिवसभर शुकशुकाट पसरला होता. मराठा समाज बांधवांनी राज्य सरकारच्या विरोधात कुरुंदवाड शहरातून निषेध रॅली काढून पालिका चौकात आल्यानंतर या रॅलीचे निषेध सभेत रुपांतर झाले.

या निषेध सभेत बोलताना माजी नगराध्यक्ष दयानंद मालवेकर म्हणाले राज्य सरकारने मराठा समाजाला आरक्षण देण्याची घोषणा केली मात्र त्याची मागासवर्ग आयोगाकडे पूर्तता करण्यासाठी कोणतीच हालचाली केलेल्या नाहीत शिवसेना जिल्हाप्रमुख वैभव उगळे म्हणाले मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी अण्णासाहेब पाटील यांनी आपले बलिदान दिले आहे जरांगे पाटील यांचे आम्ही बलिदान देऊ देणार नाही आरक्षण मिळवल्याशिवाय गप्प बसणार नाही असे सांगितले.

यावेळी महिपती बाबर गोपाळ चव्हाण बबलू पवार मिलिंद गोरे रामचंद्र मोहिते आदींनी भाषणे केली.

यावेळी नायकू ढेरे,रमेश भूजुगडे, कृष्णा नरके,आण्णासाहेब शिंदे,सुरेश बिंदगे,राजू आवळे,आनंदा पवार,तुकाराम पवार,आनंदा बेले,अनिल चव्हाण, रुपाली शिंदे,शितल उगळे,सरिता बिडकर,

आरती डकरे,सुरेखा पवारआदी महिला व सकल मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# खाकी वर्दीने आंतरराष्ट्रीय मास्टर्स गेम्स स्पर्धेत महाराष्ट्राला मिळवून दिले सुवर्ण पदक

## सहाय्यक पोलीस निरीक्षक केशव वाबळे सर्वोच्च कामगिरी

**पाटस :** पोलिसांची खाकी वर्दी फक्त चोर, गुन्हेगारांना पकडणे, कायदा सुव्यवस्था व शांतता राखण्याचेच काम करीत नाही, तर या पोलीस दलात अनेक पोलीस अधिकारी आणि कर्मचारी हे आपल्या वेगवेगळ्या कलेत माहीर असतात, मग ते गायन, किक्रेट असो की इतर कोणत्याही खेळ, पोलिसांमध्ये अनेक गुण असतात, ते म्हणतात ना, आवड असली की सवड मिळते. ती आवड शालेय जीवनातच असावी लागते. मग संधी मिळाली की, ते सोनं करतात. शालेय जीवनातच धावणे तसेच इतर मैदानी खेळांची आवड असलेले अनेकजण असतात. पाटस पोलीस चौकीचे तत्कालीन आणि सध्या शिक्रापूर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले सहायक पोलिस निरीक्षक केशव वाबळे यांनी गोवा येथे नुकत्याच पार पडलेल्या नॅशनल मास्टर्स गेम्स २०२४ या विविध स्पर्धांमध्ये महाराष्ट्राचे नेतृत्व करत महाराष्ट्राला धावण्याच्या स्पर्धेत सुवर्णपदक व रौप्यपदक मिळवून दिले आहे.




त्यांच्या या कामगिरीमुळे पोलीस दलाचीच नव्हे, तर महाराष्ट्राची मान उंचावली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक केशव वाबळे यांनी दौंड तालुक्यातील यवत पोलीस ठाण्याच्या अंतर्गत असलेल्या पाटस पोलीस चौकीत काम केले आहे. त्यांनी अनेक गंभीर गुन्ह्यांचा छडा लावून आरोपींना जेरबंद करण्याचे काम केले आहे. तसेच त्यांनी पाटस पोलीस चौकीचा कायापालटही केला.

पाटस पोलीस चौकीत तक्रार घेऊन येणाऱ्या नागरिकांना बसण्यासाठी जागा उपलब्ध नव्हती. त्यांना उन्हात आणि पावसाळ्यात त्रास सहन करावा लागत होता. चौकीच्या आवारात गवताची घाण, अपघातग्रस्त वाहनांनी गर्दी यामुळे ही पोलीस चौकी आहे हे वाटत नव्हते, मात्र केशव वाबळे यांनी पोलीस चौकीच्या समोर पत्राचे बांधकाम करून नागरिकांना बसण्यासाठी निवारा उपलब्ध करून दिला. पोलीस चौकीला रंगरंगोटी करून सजावट केली. आतापर्यंत पोलीस चौकीत अनेक अधिकारी काम करुन गेले, मात्र त्यांनी या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले. मात्र याला अपवाद ठरले ते केशव वाबळे. पोलीस चौकीत येणारे नागरिक वाबळे यांच्या या कामाचे आजही कौतुक करतात. मागील महिन्यात १ जानेवारी रोजी भीमा कोरेगाव च्या ऐतिहासिक विजयस्तंभाला मानवंदना देण्यासाठी भीम अनुयायांची सुरक्षितता त्यांची गैरसोय होऊ नये म्हणून विविध उपक्रम राबवून सामाजिक सलोखा आणि शांतता राखण्याचे काम त्यांनी शिक्रापूर आणि कोरेगाव परिसरात केले. त्यांची दखल अनेक वृत्तपत्रांनी घेतली आणि वरीष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी ही कौतुक केले.

ही कामगिरी पोलीस दलातच नव्हे, तर आता त्यांनी हे कामगिरी खेळाच्या मैदानातही करून दाखवली. ८ ते १३ फेब्रुवारी २०२४ दरम्यान गोवा येथे नॅशनल मास्टर्स गेम्स स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत अथलेटिक्स फुटबॉल, कबड्डी, बास्केटबॉल स्विमिंग, वेटलिफ्टिंग, हॉकी, योगा या खेळांचा सहभाग होता. महाराष्ट्रातर्फे एकूण ५०७ खेळाडूंनी या स्पर्धेमध्ये वेगवेगळ्या खेळांमध्ये सहभाग घेतला होता. केशव वाबळे हे महाराष्ट्र टीमचे कॅप्टन होते. या स्पर्धेमध्ये त्यांनी ८०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत सिल्व्हर मेडल तर ४ १०० मीटर रिले रनिंग मध्ये गोल्ड मेडल मिळवले आहे.

# जल जीवन मिशन अंतर्गत येत्या २० फेब्रुवारी रोजी जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन : मनिषा आव्हाळे

**सोलापूर :** जल जीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात विद्यार्थ्यांमध्ये पिण्याच्या पाण्याचे महत्व व जलसंवर्धन या विषयी जनजागृती व्हावी या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय विजेत्या पहिल्या तीन स्पर्धकांसाठी मंगळवार दि.२० फेब्रुवारी २०२४ रोजी जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये सकाळी १० वाजता जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी दिली.



जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत हर घर नल से जल देण्यासाठी पाणी पुरवठा योजनांची कामे प्रगतीपथावर सुरु आहेत. पिण्याचे पाणी , पाणी पुरवठा योजना , योजनेमध्ये लोकसहभाग , पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत झाले नंतर योजनेची देखभाल तसेच योजना शाश्वत राहण्यासाठी पाणीपट्टी वसुली व स्रोत बळकटीकरणासाठी जल संवर्धन याचे महत्व विद्यार्थी दशेपासूनच रुजावे व त्यांच्यात पाण्याविषयी जनजागृती व्हावी यासाठी जलशक्ती मंत्रालय , भारत सरकार व पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने या जिल्ह्यात सर्व तालुका स्तरावर निबंध , चित्रकला , लघुपट स्पर्धा तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयिन गटातील विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.या तालुकास्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या पहिल्या स्पर्धकांमधून जिल्हास्तरीय स्पर्धा होणार आहे.

या जिल्हास्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेसाठी पाऊस पाणी संकलन,पाणी आडवा पाणी जिरवा,जल हेच जीवन , माझ्या गावातील पाणी पुरवठा पाण्याचे स्रोत बळकटीकरण, पाण्याचे सुयोग्य वितरण व देखभाल दुरुस्ती जल संवर्धन हे विषय आहेत.या वक्तृत्व स्पर्धांसाठी ११ वी ते १२वी हा कनिष्ठ गट व पदवीपर्यंत असे महाविदयालयीन दोन गट होते.सर्व तालुक्यातील या दोन्ही गटातील प्रथम , द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांमधील स्पर्धकांसाठी जिल्हास्तरावर स्पर्धा होणार आहे.या जिल्हास्तरावरील दोन्ही गटात प्रथम , द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावणा-या विद्यार्थ्यांना अनुक्रमे २१ हजार , ११ हजार व ५ हजार पाचशे रूपये अशी रोख बक्षीस , सन्मान चिन्ह व प्रमाण पत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.सदर स्पर्धेसाठी जिल्ह्यातील तालुकास्तरीय पहिल्या तीन विजेत्या स्पर्धकांसाठी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( पाणी व स्वच्छता ) अमोल जाधव व ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सुनिल कटकधोंड यांनी केले आहे.

# शैलेंद्र बेल्हेकर यांना पँथररत्न पुरस्कार प्रदान

**हडपसर :** मांजरी बुद्रुक येथील सामाजिक कार्य करणारे शैलेंद्र बेल्हेकर यांना पँथररत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.पद्मश्री नामदेव ढसाळ यांच्या ७४व्या जयंती निमित्ताने दलित पँथरच्या वतीने आयोजित कार्यक्रमात माजी राज्यमंत्री अविनाश महातेकर यांच्या हस्ते व्यसनमुक्ती जनजागृति अभियानाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणारे सामाजिक कार्यकर्ते शैलेंद्र बेल्हेकर यांना पँथररत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे संयोजक दलित पँथरचे राष्ट्रीय अध्यक्ष यशवंत नडगम व्यासपीठावर उपस्थित होते.

सामाजिक भान ठेऊन निःस्वार्थीपणे समाजासाठी काम करणाऱ्या बहुजन समाजातील तरुणांना जुन्याजाणत्या अनुभवी लोकांनी पाठबळ दिले. त्यांचा सन्मान केला तर ते अधिक जोमाने सामाजिक कार्य करतील , समाजात काम करणा-या



व्यक्तींचा सन्मान व्हायला पाहिजे असे रिपाइंचे जेष्ठ नेते अविनाश महातेकर यांनी सांगितले.

# महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये संरक्षक जाळी बसवा, सुरक्षा उपाययोजना करा : शंकर जगताप

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील सर्व शाळांमध्ये सुरक्षा कठडे, खिडक्यांना सुरक्षा जाळ्या, उंच इमारतींमध्ये प्रत्येक मजल्यावर आडवी संरक्षक जाळी, औषधोपचाराची पेटी तसेच इतर सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पिंपरी-चिंचवड भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी आयुक्त शेखर सिंह यांनी केली आहे.

यासंदर्भात शंकर जगताप यांनी आयुक्त शेखर सिंह यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, महापालिकेच्या चिंचवडगाव येथील हुतात्मा चापेकर शाळेत आज अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे. या शाळेतील आठवीचा विद्यार्थी सार्थक कांबळे हा शाळेच्या तिसऱ्या मजल्यावरून पडल्याने त्याचा मृत्यू झाला आहे. ही महानगरपालिकेला विचार करायला लावणारी घटना आहे. महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक ती उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिकणारे सर्व विद्यार्थी अत्यंत गोरगरीब घरातील असतात. या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची काळजी घेणे ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे. चिंचवडगावातील हुतात्मा चापेकर शाळेत घडलेली दुर्दैवी घटना पुन्हा महानगरपालिकेच्या अन्य कोणत्याही शाळेत घडू नये यासाठी प्रशासनाने सतर्क होऊन आवश्यक उपाययोजना करावी.


महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये सुरक्षा कठडे, खिडक्यांना सुरक्षा जाळ्या बसवावेत. महानगरपालिकेच्या बहुतांश शाळांच्या इमारती उंच आहेत. या उंच इमारतींमध्ये लहान मुले शिक्षण घेत असतात. मुले खोडकर असणे हे नैसर्गिक आहे. या खोडकरणातून एखादी दुर्दैवी घटना घडू शकते, याची या निरागस मुलांना कल्पना नसते. त्यामुळे खोडकरणातून एखादी घडलेली दुर्दैवी घटना टाळण्यासाठी महानगरपालिका शाळांच्या उंच इमारतींमध्ये प्रत्येक मजल्यावर आडवी संरक्षक जाळी सर्वात आधी बसविण्यासाठी खबरदारी महानगरपालिका प्रशासनाने घ्यावी. त्याचप्रमाणे सर्व शाळांमध्ये औषधोपचार पेटी व इतर आवश्यक सुरक्षा उपाययोजनाही व अग्निशमनासाठीची उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# मला एकटे पाडण्याचा डाव : अजित पवार झाले भावनिक

## माझ्या कुटुंबातील इतर सर्व विरोधात प्रचार करतील मी 'त्यांचा 'मुलगा असतो तर पक्ष माझ्या ताब्यात असता

**बारामती :** होणाऱ्या लोकसभा निवडणूकीत अजित पवार उभा आहे, असे समजून महायुतीचा उमेदवार बारामती लोकसभा मतदार संघातून विजयी करा, असे आवाहन करत असताना या निवडणूकीत मी व माझ्या परिवारातील सदस्य सोडले तर कुटुंबातील इतर सदस्य माझ्या विरोधात प्रचार करतील, सध्या मला एकटं पाडण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या बारामती येथील मेळाव्यात काहीसे भावनिक झाले. शरद पवार यांच्या नावाचा उल्लेख न करता वरिष्ठ असा उल्लेख करत मी जर त्यांचा पुत्र असतो, तर पक्ष माझ्या ताब्यात असता, मी त्यांच्या सख्ख्या भावाचा मुलगा आहे, असे सांगत होणाऱ्या निवडणुकीमध्ये ते भावनिक करतील, मात्र कामाची धमक माझ्यात असून बारामतीकरांनी आपला विकास करण्यासाठी माझ्या विचाराचा उमेदवार विजयी करा ,असे आवाहन अजित पवार यांनी यावेळी केले

. बारामती शहरातील वृंदावन गार्डन या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आयोजित पदाधिकारी व कार्यकर्ता मेळाव्यात उपमुख्यमंत्री अजित पवार बोलत होते. यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर, केशवराव जगताप, पुरुषोत्तम जगताप, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष संभाजी होळकर, शहराध्यक्ष जय पाटील, पोपटराव गावडे, सचिन सातव,बाळासाहेब तावरे, सुनिल



पवार,अविनाश बांदल,अनिता गायकवाड आदीसह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी पवार म्हणाले, १९८७ पासून आपण राजकीय जीवनास सुरुवात केली. त्यांनी संधी दिल्यामुळे राजकीय क्षेत्रात मला मोठे अनुभव आले. ३२ ते ३३ वर्ष खूप काम केले. मात्र सध्या असा प्रसंग उद्भवला नको होता. ज्यावेळी तरुण पिढी पुढे येते, त्यावेळी वरिष्ठांनी मार्गदर्शन करण्याची भूमिका घेतली पाहिजे. गेलं काही दिवसांपूर्वी वरिष्ठांनी राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदाच्या राजीनाम्याची भूमिका घेतली. त्यानंतर पुन्हा राजीनामा मागे घेतला. मागील काळात आर आर पाटील, छगन भुजबळ यांना उपमुख्यमंत्री पदाची त्यांनी संधी दिली. २०१० मध्ये आपणास उपमुख्यमंत्री पदी काम करण्याची संधी मिळाली. या पदाच्या माध्यमातून आपण चांद्यापासून बांद्यापर्यंत काम करण्याची भूमिका घेतली.

आपण महायुतीमध्ये जाण्यापूर्वी राष्ट्रवादीतील आमदार थांबायला तयार नव्हते. सत्ता नसल्याने अनेक विकास कामे थांबली होती. त्यामुळे राष्ट्रवादीतील बहुसंख्य आमदारांनी विरोधी भूमिका घेण्यासाठी सह्या केल्या होत्या. जनतेच्या भल्यासाठी आपण सत्तेमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदासह अर्थ खात्याची जबाबदारी मिळाल्यानंतर आपण अनेक कामे मार्गी लावली आहेत. मी सकाळी सहा वाजल्यापासून कामाला सुरुवात करतो. मात्र काही जण माझ्यावर भ्रष्टाचाराचा आरोप करून माझी बदनामी करत आहेत. काम करतो त्याच्यावर आरोप होतात. ते मंत्री नसल्याने त्यांनी कामेच केली नाहीत, त्यामुळे त्यांच्यावर आरोप होत नाहीत, अशी टीका खासदार सुप्रिया सुळे यांचे नाव न घेता त्यांनी केली.

सतरा वर्षानंतर चहाच्या टपरीवर ते चहा प्यायला जात आहेत, मात्र मी कामांमध्ये व्यस्त असल्याने मला चहा पिण्यात वेळ घालवता येत नाही, अशी कोपरखळी अजित पवार यांनी यावेळी मारली. बारामती शहर व तालुक्यातील विकासासाठी सर्वाधिक निधी आपण आणला आहे. बारामती तालुक्यात जेवढी दर्जेदार कामे झालीं आहेत, एवढी दर्जेदार कामे अन्य कोणत्याही तालुक्यात झालेली नाहीत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ची बारामती तालुक्यात ७०४ कोटी रुपयांची कामे सुरू आहेत तर बारामती शहरात ३०० कोटींची कामे सुरू आहेत. केंद्रात ज्या ज्या पक्षाचे सरकार आहे, सरकारमधील लोकप्रतिनिधींची कामे प्राधान्याने मार्गी लागतात. त्यामुळे आपण विकास कामांसाठी निधी कमी पडू देणार नाही. होणाऱ्या बारामती लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत जर डाग लागला तर देशाच्या व राज्याच्या राजकारणात माझी किंमत कमी होईल, मुळे अजित पवार उमेदवार आहे असे समजून महायुतीच्या उमेदवाराला मोठया मताधिक्याने विजयी करा, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. लोकसभा निवडणुकीमध्ये कोणीही उमेदवारावर वैयक्तिक स्वरूपात टीका टिप्पणी करू नये, कोणीही आपली पातळी सोडून प्रचार करू नये, आपल्यातील मतभेद बाजूला ठेवून काम करावे.

दुसऱ्या गटात गेल्यानंतर कामासाठी इकडेच यावे लागेल, काम मीच करू शकतो, असे अजित पवार म्हणाले. स्वागत राष्ट्रवादी शहराध्यक्ष पाटील यांनी केले. राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष संभाजी होळकर यांनी प्रास्तविक केले. यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष प्रवीण आटोळे यांच्यासह त्यांच्या समर्थकांनी तसेच बारामती शहरातील वंचित बहुजन आघाडीच्या काही कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला.

# संचित इरगोंडा बंडगर या विद्यार्थ्याने संपादन केले घवघवीत यश

**कुरुंदवाड :** क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे तथा उपसंचालक क्रीडा व युवक सेवा अमरावती विभाग अमरावती यांचे द्वारा आयोजित राज्यस्तरीय १७ वर्षाखालील, शालेय मॉडर्न पेंटेथलॉन क्रीडा स्पर्धा (१२०० मीटर रनिंग १०० मीटर स्विमिंग - १२०० मीटर रनिंग) सन २०२३ २४ मध्ये दिनांक ११, १२, १३ फेब्रुवारी २०२४ रोजी अमरावती येथे झालेल्या क्रीडा स्पर्धेत संचित इरगोंडा बंडगर कुरुंदवाड या विद्यार्थ्याने घवघवीत यश संपादन केले आहे.

या स्पर्धेतून त्याची नॅशनल स्पर्धेसाठी निवड करण्यात आलेली आहे. सदर विद्यार्थी हा साने गुरुजी विद्यालय कुरुंदवाड तालुका शिरोळ जिल्हा कोल्हापूर या शाळेत इयत्ता नववी मध्ये शिकत आहे.

त्याला साने गुरुजी शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी अजित पाटील मुख्याध्यापक तसेच क्रीडाशिक्षक माळी सर व तावदारे सर तसेच श्री दत्त शेतकरी सहकारी कारखाना लिमिटेड शिरोळ या



कारखान्याचे चेअरमन श्री. गणपतराव पाटील तसेच कोच श्री नवनाथ पुजारी सर शिरोळ तसेच आय एम सी क्लब इचलकरंजीचे बर्गे सर व तेथील स्टाफ तसेच तेथील सर्व पालक यांचे मार्गदर्शन लाभले.

त्याचबरोबर त्याला आई, वडील, काका, काकू, आजी व सर्व बंडगर कुटुंबीय तसेच श्री. बाबासाहेब सावगावे व सर्व सावगावे कुटुंबीयांचे व मित्रमंडळी यांचे मार्गदर्शन मिळाले. कुरुंदवाडच्या इतिहासात या क्रीडा प्रकारात नॅशनल स्पर्धेसाठी निवड होणारा हा पहिलाच खेळाडू ठरलेला आहे त्यामुळे त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.